Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 663 – 666

DOI: 10.5281/zenodo.10279087

Original Research Article

# गांधीवाद: एक शास्वत विकासाची प्रेरणा

डॉ. रावसाहेब पिराजी इंगळे[1] आणि डॉ. विजय नागोराव भोपाळे[2]

[1]विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हाडोळती ता. अहमदपूर जि. लातूर ४१३५१४ महाराष्ट्र, भारत

[2]विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग, स्वा. सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा जि. परभणी ४३१५११ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: [1]rpingle77@gmail.com; [2]vijaybhopale9@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## गोषवारा

महात्मा, बापू, राष्ट्रपिता या संबोधनाने महात्मा गांधी यांना आज जगभर ओळखले जाते. सत्य, अहिंसा, अपरिग्रह इत्यादी नैतिक मूल्यांच्या आधारावरच महात्मा गांधी यांनी भारताला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त केले. गांधी यांनी धर्म, अर्थकारण, राजकारण अथवा एकूण जीवनाचे जे तत्त्वज्ञान मांडले, त्यात त्यांनी अर्थशास्त्र आणि नीतीशास्त्र यांना एकत्रित केले आहे. गांधी असे म्हणतात की, आर्थिक जीवनावर नीतीशास्त्राचा प्रभाव नसेल तर भौतिकवादाच्या अतिरेकामुळे राष्ट्रीय कल्याण साधता येणार नाही. असे प्रभावी विचार महात्मा गांधी यांनी मांडले. त्यांचे विचार चिरंतन, शास्वत असेच आहेत, असे म्हणता येईल.

## सूचक शब्द

विकेंद्रीकरण, भौतिकवाद, सामाजिक कल्याण, विश्वस्त, सत्य, अहिंसा, चिरंतन.

## प्रास्ताविक

महात्मा गांधी यांनी मांडलेल्या आर्थिक तत्त्वज्ञानाला प्रारंभीच्या काळात विरोध करण्यात आला कारण पाश्चात्य भौतिकवादी संस्कृतीचा गांधी यांनी विरोध केला होता. महात्मा गांधी यांनी लिहिलेल्या 'हिंदू स्वराज' या ग्रंथात पूर्ण भौतिकवादी पाश्चात्य  संस्कृतीच्या विरोधात भूमिका घेतलेली दिसून येते. पुढे 1919 ते 1934 या काळात महात्मा गांधी यांनी मांडलेल्या आर्थिक विचारात एक सकारात्मकता आली कारण वरील 'हिंद स्वराज' या ग्रंथात भौतिक जीवनाला

प्राधान्य देणाऱ्या पाश्चात्त्य संस्कृतीला महात्मा गांधी यांनी स्वराज्य, स्वदेशी, ग्रामोद्योग, खादी, कुटीर उद्योग, सर्वोदय, ग्रास्वराज्य इत्यादीचा स्वरूपात पर्याय उपलब्ध करून दिले. मानवी जीवनात आर्थिक कल्याण साध्य करण्याचा नवा मार्ग महात्मा गांधी यांनी सांगितले आहे. म्हणून महात्मा गांधी यांनी मांडलेल्या अर्थविषयक व शास्वत विचाराला आधुनिक युगात अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

**संशोधनाचे उद्देश**

१. महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.

२. मानवी कल्याणाबाबत महात्मा गांधीजी यांनी सांगितलेल्या मार्गांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहिते**

१. विकेंद्रीकरण हा आर्थिक विकासाचा पाया आहे

२. स्पर्धा हे मानवी दुःखाचे मूळ कारण आहे.

**संशोधन पद्धती**

वरील शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. तसेच द्वितीयक माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**महात्मा गांधींच्या अर्थ व शास्वत विचारांची तत्वे**

**मानवी जीवन**

प्रत्येक व्यक्ती हा भौतिक सुख प्राप्त करण्यासाठी धडपडत असतो. त्यातून मुद्रा, व्यक्ती व्यक्तीमधील स्पर्धा, धनाचा संचय इत्यादीमुळे सामाजिक संबंध बिघडतात. समाजात ताण-तणाव, नैराश्य निर्माण होते. आर्थिक स्पर्धा ऐवजी मानवी संबंध हे प्रेम, सहकार्य, सत्य यावर आधारित असतील तर राष्ट्राच्या विकासाला त्यातून चालना मिळते. दुर्मिळ साधनांच्या प्राप्तीसाठी व्यक्ती सतत प्रयत्न करत असतो. त्यातून मुबलक प्रमाणात उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक साधनांच्या पुरेपूर वापराकडे दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे राष्ट्राची प्रगती खुंटते. त्यातून दुर्मिळ साधनासाठी होणाऱ्या स्पर्धेमुळे हिंसेला चालना मिळते, असे पाश्चात्य भौतिक सुखासाठी वाढत्या स्पर्धेसंदर्भात महात्मा गांधी यांनी प्रखडपणे विचार मांडले. हे महात्मा गांधी यांनी मांडलेले विचार आजच्या पिढीला शास्वत व प्रेरणादायी ठरतात.

**साधी राहणी उच्च विचारसरणी**

महात्मा गांधी यांनी समाजात जेवढ्या नवनवीन वस्तू निर्माण होतात, तेवढ्या मानवी गरजा वाढत जातात. मानवी जीवन गुंतागुंतीचे बनते. मानवांनी आपल्या गरजा मर्यादित ठेवल्या पाहिजेत. त्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे. आहे त्यात आनंद मानणे ही जीवनाची खरी गुरुकिल्ली आहे, असे महात्मा गांधी यांनी म्हटलेले आहे. साधी राहणी उच्च

विचार ठेवून गरजा मर्यादित ठेवल्यास माणसाला आत्मिक आनंद मिळतो आणि त्याच्या इतकी प्रगती कोणतीही नसू शकते. महात्मा गांधी यांनी यांत्रिकीकरणाला विरोध केला. भारतासारख्या देशात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या असल्यामुळे मोठ्या प्रमाणावरील यांत्रिकीकरण करणे भारताला फायदेशीर ठरत नाही. तर लघुउद्योग उभारल्यास भारताची प्रगती होईल. त्याशिवाय भारतातील जनतेला रोजगार मिळेल आणि वस्तुविनिमय पद्धतीद्वारे प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण होऊन भारताची आर्थिक प्रगती होऊ शकेल. असे महात्मा गांधी यांनी विचार मांडले.

**विकेंद्रीकरण**

ज्याप्रमाणे गोपाळ कृष्ण गोखले यांनी देशाची कर प्रणाली विकेंद्रीत असावी. राष्ट्राला त्यांचे स्वतंत्र कर लावता यावेत, असे प्रखर विचार मांडले. त्याचप्रमाणे महात्मा गांधी यांनी सुद्धा आर्थिक व्यवस्थेचे विभाजन छोट्या छोट्या घटकात झाले पाहिजे, असा दृष्टिकोन त्यांनी मांडला. आर्थिक केंद्रीकरण हे शुद्ध गुलामगिरीचे लक्षण आहे, असे विचार महात्मा गांधी यांनी मांडले. देशातील संपूर्ण मालमत्ता ही समाजाच्या मालकीची आहे. म्हणून भांडवलदार वर्गाने स्वतःला संपत्तीचे मालक न समजता सामाजिक संपत्तीची जोपासना करणारा विश्वस्त म्हणून काम केल्यास समाजातील मालक-मजूर संबंध एकोप्याचे असतील. त्यांच्यातील वैरभावना संपुष्टात येईल. अशा प्रकारचे विचार महात्मा गांधी यांनी भारताच्या शास्वत व चिरंतन विकासा संदर्भात मांडले.

**निष्कर्ष**

१. महात्मा गांधी यांनी मांडलेल्या आर्थिक विकासाचा मार्ग काल, आज आणि उद्या साठी उपयुक्त व शास्वत ठरणारा आहे.
२. महात्मा गांधी यांनी सांगितलेल्या मुबलक नैसर्गिक संसाधनांचा महत्तम व काटकसरीने उपयोग करणे हा आर्थिक विकासाचा खरा मार्ग होय.
३. थोडक्यात, महात्मा गांधी यांनी भारतीय अर्थव्यवस्थेसंदर्भात सर्व समावेशक विकास, मानवी जीवन सुखकर व समृद्धी होण्यासाठी जे विचार सांगितले, ते चिरंतन ठरतात. महात्मा गांधी यांची आर्थिक जीवनाची कल्पना सत्य, अहिंसा व ईश्वर या कल्पनेच्या आधारे भारतीयांच्या प्रगतीची ठरू शकते, यात दुमत नाही.

**संदर्भ सूची**

१. नानी पालखीवाला, 'वुई द पिपल', अनु. वि. स. वाळिंबे, मेहता पब्लिकेशन्स, पुणे - तिसरे पुनर्मुद्रण २००२.
२. कै. वा. गो. आपटे, 'मराठी शब्दरत्नाकर', सरस्वती बुक कंपनी, पुणे २ - पुनर्मुद्रण २०१४.
३. गोखले द. न., 'गांधीजी मानव नि महामानव', मौज प्रकाशन, मुंबई, १८९६.
४. महात्मा गांधी, 'सत्याचे प्रयोग', नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, २००५.
५. डॉ. कुंभार नागोराव, 'महात्मा गांधी: विचार दर्शन' प्रबोधन प्रकाशन, १९९५.

६. गांधी मो. क., 'चारित्र्य आणि राष्ट्र निर्माण', नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, सप्टेंबर २००५.

७. Radhakrishnan, S. (Ed.), 'Mahatma Gandhi - 100 Years'